# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक १२/०७/२०२३

➤ **घरफोडी :-**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो.स्टे. वलगांव अप.क्र. २२०/२०२३ कलम ४५४, ४५७, ३८भादवि | ग्राम आष्टी | ११/०७/२०२३ चे ११.०० वा ते २३.०० वा दाखल ता. वेळ दि. १२/०७/२०२३ चे १५३० वा. | एक महिला | निलेश छगनराव फुटाने वय ३५ वर्ष रा. आष्टी ता. भातकुली जि. अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की. दि. १०/०७/२०२३ रोजी रात्री १०.०० वा घराला कुलुप लावून मलकापुर खल्लार येथे गेली होती. माझा मुलगा हा कामावर गेला होता. काल दिनांक ११/०७/२०२३ रोजी रात्री ११.०० वा माझा मुलगा यांचा मला फोन आला की मी आज सकाळी ११.०० वा घराला कुलुप लावून डयुटीवर गेला होता. रात्री ११.०० वा परत आलो असता आपल्या घराचा कोंडा तुटलेला दिसला व घरात चोरी झाल्याचे दिसले. तसेच मी व माझे सोबत माझे मावस देर व त्यांची असे आम्ही रात्री १२.०० वा दरम्यान आष्टी येथे माझे घरी आलो. माझे घराचे मेन दाराचा कोंडा तुटलेला दिसला. मी घरात जावून लोखंडी कपाट पाहले असता कपाटातील माझे ७५०० रू नगदी दिसुन आले नाही. कपाटातील चांदीचे भांडी १. दोन तोरडयाचे जोड वनज ४० ग्रॅम किंमत १६०० रू २. एक करदोळा वनज अंदाजे १० ग्रॅम किंमत ४०० रू ३. एक जोडव्याचा जोड वनज १५ ग्रॅम किंमत ६०० रू ४. लहान मुलाचे चाळ एक जोड वनज अंदाजे १० ग्रॅम किंमत ४०० रू ५. ६० किलो सोयाबीचे कटटा किंमत ३६०० रू ६. जुने वापरते निळया रंगाचे मिक्सर किंमत १००० रू ७. हिटर किंमत ३०० रू असा एकुण ७९०० रू चे भांडी व नगदी ७५०० रू असा एकुण १५४०० रू. नगदी व साहीत्य चोरी गेल्याचे दिसले. माझे घरा शेजारी राहणारा निलेश वय ३५ वर्ष याने माझे घरी चोरी केल्याचा माझा संशय आहे. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | अप क्र २६७/२३ कलम ४५४,४५७,३८० भादवी | राहते घरी शिवनेरी नगर सेक्टर ३ देशमुख लॉंनचे मागे अमरावती | दि १०/०७/२३ चे १०/०० वा ते दि १२/०७/२३ चे ०६/३० वा<br><br>माहीता ता वेळ दि १२/०७/२३ चे १२/०० वा<br><br>दाखल ता वेळ- दि १२/०७/२३ चे १३/०१ वा | ज्ञानेश्वर विश्वासराव कुपटे वय ३५ वर्षे रा.शिवनेरी नगर सेक्टर -२ देशमुख लॉंनचे मागे अमरावती | अज्ञात | थोडक्यात हकीगत अशा प्रकारे आही की नमुद घटणा ता वेळी व ठिकाणी यतील अर्जदार हे दि १०/०७/२३ चे १०/०० वा.त्याचे घराला कुलुप लावुन त्यांचे मुळ गावी गेले असता व दि १२/०७/२३ रोजी ०६/३० वा घरी आले असता त्यांचे घराचे मुख्य दरवाज्याचे कुलुप कोंडा तुटलेला दिसला व आज जावुन महारीले असता बेडरुम मधील लोखंडी कपाट तुटलेले दिसले त्या मधील पर्स मधील ठेवलेले १) ७ ग्रॅम सोन्याची अंगठी कि.अं.२४५०० रुपये २) ५ ग्रॅम सोन्याची अंगठी कि.अं.१६५०० रुपये ३)१ ग्रॅम सोन्याची नथ कि.अं.३५०० रुपये ४)२ ग्रॅम कानातले कि.अं.७००० रुपये ५)१ ग्रॅम सोन्याचे मनगट २ नग कि.अं.३५०० रुपये असा एकुण ५६००० रुपये तसेच ६)चांदीचे सिक्के वजन १० ग्रॅम कि.अं.७०० रुपये ७)५ चांदीच्या तोरड्या लहान मुलांचे वजन ५० ग्रॅम कि.अं.२५०० रुपये ८)१ चांदीचा करदोळा वजन १५ ग्रॅम कि.अं.७०० रुपये असा एकुण ३७०० रुपये दागीने तसेच नगदी १०००० रुपये असा एकुण ६९७०० रुपयाचे मुद्येमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला असा फिर्यादी यांचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ जबरी चोरी :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो.स्टै. खोलापुरीगेट १२९/२३ कलम ३९४,३४ | रंगारी गल्ली से साबनपुरा अमरावती | ११/०७/२३ चे २२/२० वा. १२/०७/२०२३ चे ०१/०३ वा | आसिन हुसेन वल्द इकबाल हुसेन वय १८ वर्ष रा पठाणपुरा नेरपिंगळाई ता मोर्शी हु.मु. | २० ते २५ वयोगटातील दोन अज्ञात इसम | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील फिर्व्यादी हे नमुद घटना ता वेळी व ठिकाणी हे त्यांचा मोठा भाऊ आमिर हुसेन यास आई कडुन घेतलेले नगदी १०,००० रुपये देणे कामी साबनपुरा येथुन जात असताना दोन इसम २०/२५ वयोगटातील चैह-यावर दुपट्टा बांधलेल्या इसमांनी फिस थांबवुन फिर्यादी सोबत मारहाण करुन फिचे डाव्याहाताचे दंडावर काहीतरी मारुन जखमी करुन फि.चे पॅन्ट चे खिश्यातील आई ने दिलेले नगदी १०,००० रु व फिचे स्वत चे ४५०० रु नगदी असे एकुन १४५०० रु नगदी बळजबीने हिसकावुन घेतले फिचे जबानी रिपोर्टवरुन सदर चा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मज्जीद ए अरफात के रुम मे पठाण चौक अमरावती | | |

➢ ईतर :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | बडनेरा अप नं. ५१५/२०२३ कलम ४२९ भादवी | मंदाकिनि सुर्यवंशी यांचे कोंडेश्वर येथील शेत शिवाराचा धुरा | दि. १२/७/२०२३ चे ०७.००वा दाखल ता वेळ - दि. १२/७/२०२३ चे १२.२३ वा | सुधाकर किसनराव चौधरी वय ५१ वर्ष रा गोवींदपुर ता जी अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हेफॉरेस्ट मध्ये मजुरीचे काम करित असुन त्यांचे कडे गाई गोरे आहे फि व त्याचे सासरे हे देखरेख व चरण्याकरिता जंगला नेत असतात नमुद घ ता वेळी व ठिकाणी फि यांचा गो-हा कोंडेश्वर येथील शेत शिवारातील धु-यावर चरत असतांना त्याच्या मानेला विद्युत शॉक लागल्याने तो जागेवरच मरण पावलेला दिसला कोणी तरी अज्ञात इसमाने शेताच्या धु-यावर विद्युत तारेचा (कंरट) शॉक लावलेला आहे यामुळेच फि यांचा गोरे मरण पावला आहे असा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन डि ओ सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पो.स्टे नागपुरीगेट अमरावती अप क्र ३४४/२३ कलम १४२ मपोका | ट्रान्ससपोर्ट नगर चौक परिसर अमरावती | दि. १२/०७/२०२३ चे १३/३० वा ते १३/४५ वा दाखल ता दि. १२/०७/२०२३ चे १४/५३ वा | पोहेक्ा शेख सलीम ब.न. ४६४ पो.स्टे नागपुरीगेट अमरावती | अब्दुल शारीक उर्फ शाका अब्दुल सादिक वय ३६ रा गुलीस्ता नगर अमरावती | हकीकत अशा पकारे आहे की, यातील फिर्यादी हे पो.स्टाप सह पेट्रोलींग करित असता गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, अमरावती शहर येथुन तडीपार इसम नामे अब्दुल शारीक उर्फ शाका अब्दुल सादिक वय ३६ रा गुलीस्ता नगर अमरावती हा ट्रान्ससपोर्ट नगर परिसरात वारवर आहे अशामाहीती वरुन पो.स्टाप व पंटा समक्ष खाजगी वाहनाने ट्रान्सपोर्ट नगर चाौक येथे निबाचे झाडे खाली बसलेला दिसला त्याला ताब्यात घेवुन पंचा समक्ष त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव अब्दुल शारीक उर्फ शाका अब्दुल सादिक वय ३६ रा गुलीस्ता नगर अमरावती असे सांगितले त्यास शहरात येण्याबाबत वरिष्ठांचे आदेशा बाबत विचारणा केली असता त्याचे कडे कोणतेही आदेश नाही असे सांगितले तडीपार इसम याने मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ -१ पोलीस आयुक्त कार्यालय अमरावती यांचे आदेश क्र पोउपआ/परि-१/तडीपार/३०७३/२०२२ दि . १०/१२/२०२२ अन्वये नागपुरीगेट येथुन दोन वर्षाकरिता तडीपार करण्यात आले असुन त्यास राहते घरी व जिल्ह्यात येणाची कारण विचारले असता त्याने कोणतेही कारण न देता परवांगी नसल्ययाचे सांगितले वरुन आरोपी याने आदेश क्र पोउपआ/परि-१/तडीपार/३०७३/२०२२ दि . १०/१२/२०२२ अन्वये चे उल्लघन केल्याने नमुद आरोपी विरुद्ध कलम १४२ मपोका प्रमाने गुन्हा दाखल |

➢ अकस्मात मृत्यु :-

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ८ |
| १. | पो.स्टे. फ्रेजरपुरा हर मर्ग क्र. ५३/२०२३ कलम १७४जाफौ | मगलधाम कॉलनीयेथे राहते घरी अमरावती | ।अशोक वामनराव देशमुख वय ७९ वर्ष, रा. अमर कॉलनी अमरावती | श्रीधर अशोकराव देशमुख.य ४७ वर्ष, धंदा-व्यापार,रा. अमर कॉलनी अमरावती मो.नं. ९०१०६९८५६८ | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील मृतक हे फिर्यादीचे वडिल असुन फिर्यादी हे त्यांचे नविन घरी मंगल धाम कॉलनी येथे राहायला गेले असुन त्यांना अंडकोशाचा, ह्युद्यविकाराचा आजार असुन बायपास सर्जरी झाली आहे.यातील मृतक अशोक वामनराव देशमुख व फिर्यादीची आई हे राहत होते . फिर्यादी हे त्यांचे घरी मंगल धाम कॉलनी येथे हजर असतांना फिर्यादीच्या आईचा फोन आला व फिर्यादीस म्हणाले की, बाबाने गळफास घेतलेला आहे तु लवकर ये असे सांगीतले वरुन फिर्यादी लगेच घरी आले फिर्यादीच्या वडिलांचा मृतदेह घराचे बेडरुम मधील लोखंडी कडीला गळफास घेतलेल्या अवस्थेत लटकतांना दिसला शेजारी लोकांच्या मदतीने फिर्यादीने मृतदेह दोरी सोडुन खाली उतरविला व पोलीसांना माहीती दिली फिर्यादीच्या वडिलांने` त्याच्या आजाराला कंटाळुन गळफास घेतला त्याचे मरणाबाबत फिर्यादीला कोणावरही संशय नाही अगर तक्रार नाही अशा फिर्यादीच्या जबाणि रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल |

➢ प्रोव्हीशन रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १. | पो स्टे गाडगे नगर अम | अप क्र ९१२/२०२३ कलम ६५ ई मदाका | अमरावती | दि.१२.०७.०२३ चे १२.३० वा | दि.१२.०७.०२३ चे १४.४२ वा | सर तर्फे पो हे`.का.सुभाष पाटील ब नं १२८० पो स्टे गाडगे नगर अम | एक महिला | हकिकत याप्रमाणे आहे की नमुद घ ता वेळी व स्थळी यातील फिर्यादी यांना प्राप्त बातमीवरुन प्रोव्हीशन रेड केली असता नमुद आरोपी हा त्याचे ताब्यामध्ये असलेल्या पोत्यामधुन १२ नग देशी दारु टॅगो पंच लेबल असलेले १८० एमएल च्या किंमत अंदाजे ८४० रु व १२ नग देशी दारू बॉबी सेञा असे लेबल असलेले १८० मीली की अं ८४० असा एकुन १६८०रू चा माल बाळगुन विक्री करित असतांना मिळुन आली .अशा फिचे लेखी फिर्याद वरुन सदरचा गुन्हा नोंद |
| २. | पोस्टे राजापेठ | अप क्र ६५४/२३ कलम ६५(ई) मदाका | माया नगर ए. जे. जिम जवळ आरोपीचे राहते घरासमोर अमरावती शहर | दि ११/०७/२३ चे १७.३० वा. ते १८.३० वा दरम्यान | दाखळ दि १२/०७/२३ ते ००.१९ वा | पोहेका मनिष करपे ब.न.१५२० पोस्टे राजापेठ | संतोष अंबादास कैथवास वय ४८ वर्ष रा. माया नगर ए. जे. जिम जवळ अमरावती शहर | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घता वेळी व ठिकाणी फि यांनी स्टाफसह मिळालेल्या माहीतीवर प्रोव्ही रेड केली असता यातील नमुद आरोपी याचे ताब्यात १४ नग देशी दारु टेंगो पंच कंपनीच्या पावट्या ९० मीली प्रत्येकी ३५ रु असा एकुण ४९० रु चा माल मिळुन आला पंचासमक्ष जप्त करण्यात आला नमुद आरोपी चे कृत्य कलम ६५(ई) मदाका प्रमान`होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | पोस्टे राजापेठ | अप क्र ६५५/२३ कलम ६५(ई) मदाका | माया नगर जवळ आरोपीचे राहते घरासमोर अमरावती शहर | दि ११/०७/२३ चे १९.०० वा. | दाखळ दि १२/०७/२३ ते ००.३२ वा | पोहेका मनिष करपे ब.न.१५२० पोस्टे राजापेठ | धनराज नारयण बहुराश वय ५० वर्ष रा. माया नगर अमरावती शहर | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घता वेळी व ठिकाणी फि यांनी स्टाफसह मिळालेल्या माहीतीवर प्रोव्ही रेड केली असता यातील नमुद आरोपी याचे ताब्यात १३ नग देशी दारु टेंगो पंच कंपनीच्या पावट्या ९० मीली प्रत्येकी ३५ रु असा एकुण ४५५ रु चा माल मिळुन आला पंचासमक्ष जप्त करण्यात आला नमुद आरोपी चे कृत्य कलम ६५(ई) मदाका प्रमान होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |